WRI INDIA

**THOUGHTFUL BITES**
Soch Sahi, Waste Nahi

# भारताच्या **शून्य अन्न नासाडी चळवळीत (झिरो फूड वेस्ट मुव्हमेंट मध्ये)** भाग घ्या



## आपल्या पाठिंब्याचे महत्व काय आहे

शून्य अन्न नासाडी चळवळीमध्ये आपल्या सहभागाने समाज, निसर्ग आणि वातावरण ह्या तिन्हीना फायदा होऊ शकतो. हे कोलॅटरल्स आपल्याला दिले आहेत जेणेकरून आपल्याला हा बदल घडवून आणण्यात मदत मिळेल.

# या किट मध्ये काय आहे?

**टेबल टेंट कार्ड्स** ग्राहकांसाठी दिलेले आहेत. ग्राहक त्यांचे जेवण येईपर्यंत त्या कार्ड्सवरील माहिती देणारे संदेश वाचू शकतात. कार्ड्स ठेवण्यासाठी योग्य जागा: डायनिंग एरिया, हॉटेल रूम्स.

**पोस्टर्स** ज्यांच्यावर गंमतीशीर पद्धतीने लक्ष देऊन जेवण करण्यास प्रोत्साहन देणारे संदेश दिलेले असतात. सुचवलेली जागा: डायनिंग एरिया, लॉबी, लिफ्ट्स.

**बॅजेस** जे अन्न वाया न घालवण्याची आठवण करून देतात.

**सेल्फी-बॅकड्रॉप / फोटोबूथ** जे अन्न वाया घालवत नाहीत, जबाबदारीने खातात त्यांचे कौतुक करण्यासाठी वापरू शकता.

**एक मिनिटांचा ॲनिमेटेड व्हिडिओ** ज्यात अन्न नासाडीची (फूड वेस्टची) समस्या समजावून सांगितलेली असते आणि ते थांबविण्यासाठी उपाययोजना सुचविलेल्या असतात. पेन ड्राइव्हवर शेअर केले आहे.

**जिंगल** जिच्यामुळे लोकांना जबाबदारीने अन्नाची नासाडी (फूड-वेस्ट) टाळण्यास प्रेरणा लाभते. पेन ड्राइव्हवर शेअर केले आहे.

**डिजिटल बॅनर्स** ज्यांची कल्पना पोस्टर्सपासून घेतलेली असते आणि डिजिटल पद्धतीने लक्ष देऊन खाण्याचा व अन्न नासण्याचे प्रमाण कमी करण्याचा संदेश पसरविण्यात मदत करतात.

**गुडी बॅग** शून्य अन्न नासणे (झिरो फूड वेस्ट) चॅम्पियन ग्राहकांसाठी दिलेले आहेत, ज्यात जबाबदारीने खाण्याच्या सवयींना प्रोत्साहन देण्यासाठी कार्ड गेम, ग्राहकांसाठी माहिती देणारे फ्लायर, ग्राहक बॅजेस आणि फ्रीज मॅग्नेट दिलेले असतात.

# प्रोहत्सान देण्यासाठी पुढील गोष्टी करून पहा

## फूड बेल वाजवा



- ग्राहकांनी जेवून झाल्यावर बेल वाजवावी जेणेकरून इतरांना त्यांचे कौतुक करता येईल आणि ते सुद्धा तसे करण्यास प्रवृत्त होतील




## खास टेबलचे आरक्षण (रिझर्वेशन्स) देऊ करा

- अशा स्टार ग्राहकांना देऊ करा जे पुढील वेळी येताना त्यांना बक्षीस मिळावे म्हणून त्यांचे पूर्ण जेवण संपवितात.

## एका टेबलवर नाव लावा




- सर्व खाद्यपदार्थ व्यवस्थित संपवणाऱ्या ग्राहकांचे कौतुक करण्यासाठी त्यांच्या नावाची पाटी टेबल वर लावा.



## प्रोत्साहने द्या

- विना मोबदला गोड पदार्थ वाढा किंवा पॅक करून द्या
- जवळच्या स्टोअर्सची टाय-अप कूपन्स ग्राहकांना देता येतील
- ग्राहकांना अधिक आनंद व्हावा म्हणून मफिन्स, चॉकलेट्स आणि कॅन्डीसारख्या छोट्या मोफत वस्तू द्या.

## कर्मचाऱ्यांना सामील करा

फ्रंट-ऑफ-हाऊज कर्मचाऱ्यांना पुढील प्रशिक्षण देता येईल:

- ग्राहकांना खाद्य पदार्थांचे प्रमाण व जेवणाचे घटक स्पष्ट समजावून सांगणे
- जेवणाविषयी माहिती व्यवथित आणि सोप्या समजेल अश्या शब्दात देणे






## ग्राहकांशी बोलण्याचे अधिक मार्ग जोडा

- मेन्यू मधील घटकांची माहिती सांगून पारदर्शकता राखा
- कर्मचाऱ्यांच्या युनिफॉर्म व एप्रोनवर छोटेसे व आकर्षक संदेश लिहा
- टिश्यू पेपरवर प्रमुख प्रचार संदेश लिहा
- कटलरी किंवा पॅकेजिंगवर संदेश छापून द्या
- मेंबरशिप पॉईंट्स द्या

## प्रमाणाबाबत माहिती द्या

- खाद्यपदार्थ थोडे थोडे लागेल तसे वाढा.
- मेन्यू मध्ये पदार्थ किती प्रमाणात वाढला जाईल याची कल्पना द्या



भारतातील अन्नाचे नुकसान व अन्नाची नासाडी
या समस्यांबाबत येथे अधिक जाणून घ्या